# लिसन दी सायलन्स : कर्णबधिरता विषयावरील महत्वाचे संशोधन

ऐकणे आणि बोलणे मानवाला मिळालेली निसर्गाची मोठी देन आहे. आवाजाच्या माध्यमातून ऐकणे आणि बोलणे शक्य होते. पर्यावरणातील विविध आवाज ऐकून आपण हसतो, बोलतो. आपल्या मनातील भावना विविध प्रकारे व्यक्त करतो. वातावरणातील आवाज कानी पडून आपल्या भाषेचा विकास होतो. त्यामुळे ऐकायला आले नाही तर भाषा विकास होत नाही किंवा त्यामध्ये अडथळे निर्माण होतात. या बहिरेपणामुळे सक्तीचे मुकेपण लादले जाते. त्याचा परिणाम व्यक्तीच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर होतो. हे बहिरेपण कशामुळेही येऊ शकते. विविध आजार, अपघात किंवा वयामुळे. आजचे जग हे संवादाचे जग आहे. आपले सारे जीवन संवाद साधना भोवती केन्द्रित आहे. अशा वेळी आपणाबरोबर कोणी बोलले नाही,संवाद केला नाही तर पाण्याविना मासा, तसे तडफडायला होते. साहजिकच आपली भोवती जी लाखो माणसे संवाद करू शकत नाही,त्याचे काय ? अशी अनेक माणसे आपल्या भोवती वावरत असतात. शेजारी, रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी ही माणसे खुनाच्या भाषेतून संवाद करीत असतात. आपल्याला त्यातील काही कळत नाही. पण मनात कुतूहल असते. काय बरे बोलत असतील ही माणसे.? तसे भाषिक संवाद म्हणजेच केवळ संवाद नाही. संवाद जसा भाषिक असतो तसा तो अभाषिक किंवा अमौखिक देखील असतो. आपण सर्वच जन देहबोलीचा व अमौखिक संवादाचा उपयोग करतो. कर्णबधिर देखील मग या अमौखिक संवादाचा आपल्या अभिवक्तीसाठी उपयोग करतात. आपल्या सर्वांच्या मनात अशा कर्णबधिराबद्दल अनेक प्रश्न गुंजत असतात. या प्रश्नांकडे लक्ष वेधण्याचे काम '**लिसन दी सायलन्स'** या पुस्तकाच्या माध्यमातून शैलेन्द्र बनसोडे आणि शत्रुंजय कोटे या दोन प्राध्यापकानी केले आहे.

कोपरगाव येथील सोमया महाविद्यालयात कार्यरत या प्राध्यापक जोडीने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मदतीने पुणे विद्यापीठ माध्यमातून हे संशोधन काम केले आहे. आपल्या देशातील कर्णबधिर मुलांना प्री स्कूल मध्ये स्पोकेन लँगवेजच्या माध्यमातून शिकवायचे की साईन लँगवेजच्या माध्यमातून शिकवायचे या दृष्टीकोणातून शिकणे आणि शिकविण्यात भाषेचे महत्व यावर हे संशोधन आहे. स्पोकेन लँगवेज की साईन लँगवेज हा वाद कर्णबधिराच्या शिक्षण क्षेत्रात अतिशय जुना आहे. याबाबत दोन्ही बाजूचे तज्ञ आणि विद्वान आपली मते आज ही हिरारीने मांडतात. मात्र मतभेदांच्या या गदारोळत अनेकदा कर्णबधिर मुलांचे नुकसान होत असल्याचे दिसून येते. त्यातून स्पोकन लँगवेज हे माध्यम वापरा की साईन लँगवेज, मुलांना काय उपयुक्त आहे याचा विचार होणे गरजेचे आहे. या संशोधनातून हाच निष्कर्ष पुढे आला आहे. **साईन लँगवेज पेक्षा स्पोकेन लँगवेज हे माध्यम अधिक परिणामकारक असल्याचे या संशोधनातून सिद्ध झाले आहे.** मात्र हा निष्कर्ष मांडताना प्री स्कूल मधील त्या मुलाचे वय आणि त्याच्या श्रवण दोषाचे केव्हा निदान केले हा मुद्दा देखील महत्वाचा मनाला गेला आहे. जर अगदी लहान वयात त्याचे निदान व चिकित्सा होऊन श्रवण यंत्राचा उपयोग करण्यात आला, श्रवण व वाक प्रशिक्षणाला उत्तेजन मिळाले तर मुलाच्या भाषा विकासाला चालणे मिळते हे पुनर्वसनाचे सूत्र देखील स्पष्ट

झाले आहे. हे संशोधन कर्णबधिरता या विषयाला न्याय देणारे व अभ्यासपूर्ण असल्याने वाचकाला कर्णबधिरांच्या जगाची सफर घडवून आणते.

लेखकाने संशोधन पद्धतीने या विषयाची मांडणी केली आहे. सर्वप्रथम या कर्णबधिरता विषयाची ओळख करून दिली आहे. त्याचे कारण अपंगत्व आणि विशेष करून कर्णबधीरता हा विषय तसा अनेकांच्या दृष्टीकोणातून नकोसा असलेला. बहुसंख्य वर्गाला त्याचे काही घेणे देणे नाही. त्यातच कर्णबधीरता अपंगत्व छुपे असल्याने त्याविषयी विविध गैरसमज आहेत. आपल्या परिवारात कोणी अपंग आणि विशेष करून कर्णबधिर नाही तो पर्यन्त त्याविषयी काही कोणाला देणे घेणे नाही. या पार्श्र्भूमीवर या समाज मनाला जागविण्याचे काम **लिसन दी सायलन्स** या पुस्तकाने केले आहे. लेखकाने या विषयाची तपशीलवार अनेक पैलूची ओळख करून देताना बहिरेपणा, त्याची विविध कारणे,श्रवण व निदान, तपासणी, श्रवण आलेख व विविध उपचार पद्धती,विविध तंत्र व सहायक साधने याची माहिती सोप्या भाषेत दिली आहे. त्यामुळे हे पुस्तक अपंग पुनर्वसन क्षेत्रात काम करणाऱ्या व्यावसायिक लोकासाठी व सामान्य वाचकाबरोबच मार्गदर्शक बनले आहे. हा प्रकल्प असल्याने लेखकाने संशोधन विषय, त्याची उद्दिष्टे, परिकल्पना आणि संशोधनाचे महत्व प्रतिपादन केले आहे.त्याच बरोबर आपल्या मर्यादा देखील स्पष्ट केल्या आहेत.

लेखकाने दुसऱ्या प्रकरणात साहित्याचा आढावा घेताना अपांगत्व विषयता जागतिक व राष्ट्रीय पातळीवरील विविध परिषदा, ठराव व उपयोजनाची माहिती दिली आहे. ते सारे मूळापासून अभ्यासावे असे आहे.तर तिसऱ्या प्रकरणात संशोधन पद्धती दिली आहे. त्यात एका प्री स्कूलची 40 कर्णबधिर मुले नमूना म्हणून निवडली आहेत. त्यातील पहिला गट 6 व दूसरा 7 या वयोगटातील आहेत. त्यातील 20 मुलांचे शिकण्याचे व शिकविण्याचे माध्यम हे स्पोकन लँगवेज आहे तर अन्य 20 मुलांचे माध्यम की साईन लँगवेज आहे. ती हिन्दी आणि मराठी अशी दोन्ही भाषिक आहेत. त्यासाठी प्रश्नावली तयार केली गेली व स्कूल ग्रुप टेस्टच्या माध्यमातून दृष्टी आकलन,दिशा दर्शन आकलन,अंकाचे आकलन आणि भाषा आणि अनुभव, माणसाची आकृती काढणे,श्रवण आकलन फाईन मोटर कोऑरडीनेशन आणि ग्रोस मोटर कोऑरडीनेशन ची चाचणी करण्यात आली. मुलांना सराव देण्यात आला व वारवार चाचणी करून संख्यात्मक डाटा गोळा करण्यात आला.या संशोधतून महत्वाचा निष्कर्ष समोर आला तो म्हणजे ज्या प्री स्कूल मध्ये जाणाऱ्या मुलाचे शिक्षण स्पोकन पद्धतीने होते ती मुले साईन लँगवेज पद्धतीने शिकणाऱ्या मुलापेक्षा अधिक प्रगती करतात असे दिसून येते. संशोधकाने याबाबत अनेक शिफारशी केल्या आहेत. त्यात प्रामुख्याने मुलांना विशेष किवा समावेशक शिक्षण देणे, पालकांचा सहभाग वाढविणे, सहायक साधनाचा उपयोग व जन जागृती,तंत्रज्ञानाचा अधिकाधिक उपयोग आणि एकूणच विकासाला महत्व यावर भर दिला आहे.

हे पुस्तक लिहून या विषयाला न्याय दिल्याबद्दल दोन्ही संशोधकांचे अभिनंदन.

डॉ त्र्यंबक दुनबळे

जन माध्यम प्रसारण अधिकारी,